आज्ञाधारक जॅक


एक प्राचीन कथा

लेखक: पॉल, मराठी: अश्विनी बर्वे



आज्ञाधारक जॅक

एक प्राचीन कथा





लेखक: पॉल, मराठी: अश्विनी बर्वे



एकदा एक मुलगा ज्याचे नाव जॅक होते,
तो त्याच्या विधवा आईबरोबर एका छोट्या
झोपडीत जंगलात राहत होता.

शेवटी एक दिवस त्याची आई त्याला म्हणाली,
“जॅक, आता तू पुरेसा मोठा झाला आहे आता तू
बाहेर जाऊन काम करावं आणि स्वतःचे पोट भरावे.”



"हो, आई, तू म्हणते तसंच
मी करेन." जॅक म्हणाला..



दुसऱ्या दिवशी जक घराबाहेर पडला आणि
त्याला शेजारच्या शेतकऱ्याकडे काम मिळाले.



त्या संध्याकाळी शेतकऱ्याने
दिवसभर काम केल्याचे पैसे म्हणून
एक पेनी जॅकला दिली.

जॅकच्या कपड्यांना खिसा नव्हता कारण आजपर्यंत
त्याला कधीच पैसे ठेवायची वेळ आली नव्हती.
तो घरी येत असतांना त्याचे पैसे हरवले.



जॅक घरी आल्यावर त्याची आई
त्याच्यावर ओरडली आणि म्हणाली,
“तू तुझे पैसे खिशात ठेवायला पाहिजे होते.”




“माफ कर आई!
पुढच्या वेळी तसेच करेन.”



पुढच्या दिवशी जॅकला एका दूध डेअरीत काम मिळाले. त्यादिवशी मजुरी म्हणून डेअरीवाल्याने त्याला एक जग दूध दिले. जॅकने ते त्याच्या खिशात ठेवले. आणि तो घरी निघाला.





आणि जे व्हायचे होते तेच
झाले, तो घरी पोहचण्याच्या
आत दूध खिशातून गळून गेले.



“अरे मुर्खा, तू तो जग तुझ्या डोक्यावर ठेवून आणायला पाहिजे होता.”

"बरोबर" आहे आई! पुढच्या वेळेला तसेच करेन.”





पुढच्या दिवशी दुधवाल्याने जॅकला परत काम दिले आणि त्याने कामाचा मोबदला म्हणून त्याला लोणी दिले. जॅकने ते आपल्या टोपीवर ठेवले.



ते उन्हाळ्याचे दिवस होते आणि लोणी वितळू लागले. जॅक घरी पोहचेपर्यंत त्याचे केस, त्याचा चेहरा आणि त्याचे जॅकेट वितळलेल्या लोण्यामुळे पिवळे झाले.

“तीन दिवसापासून काम करतो आहे पण हातात काहीच आले नाही.” त्याची आई म्हणाली.

“तुला माहीत नाही,तू ते झाडाच्या थंड पानात गुंडाळून हातात धरून आणायला पाहिजे होते.”



“माफ करा आई!
पुढच्या वेळेला तसेच करेन..”





पुढच्या दिवशी जॅकला एका बेकरीमध्ये काम मिळाले. संध्याकाळी बेकरीवाल्याने त्याला पैशाच्या बदल्यात एक काळे मांजर दिले. जॅकने ते मांजर ओल्या पानांमध्ये गुंडाळण्याचा प्रयत्न केला,पण त्या मांजराने त्याला बोचकारले आणि उडी मारून ते पळून गेले.

जेव्हा तो घरी पोहचला आणि त्आईने काय झाले ते ऐकले तेव्हा ती म्हणाली, “अरे मुर्खा तू त्याच्या गळ्यात दोरी बांधून घरी आणायला पाहिजे होते.”



“माफ कर आई! पुढच्या
वेलीई तू सांगितलं तसेच करेन.”





पुढच्या दिवशी जॅकला एका कसायाकडे काम मिळाले. कसायाने मोबदला म्हणून त्याला मटणाचा तुकडा दिला. तेव्हा त्याने तो तुकडा दोरीला बांधला आणि खेचत घरी घेऊन येऊ लागला. तेव्हा भुकेल्या कुत्र्याने त्यावर झडप घालून मटणाचा तुकडा खाऊन टाकला.



यावेळी आई खूपच रागावली, ती म्हणाली, "अरे मठ्ठ मुला तो मटणाचा तुकडा तू खांद्यावर घेऊन यायला पाहिजे होता एवढं तुला कळलं नाही का?"





यावेळी माफ कर आई! पुढच्या वेळी तू सांगितलं तसेच करेन.

.




जॅक हताश झाला नाही. त्याला दुसऱ्या दिवशी जवळच्या एका तबेल्यात काम मिळाले.






संपूर्ण आठवडा काम केल्यानंतर तबेल्यावाल्याने जॅकला मजुरी म्हणून एक गाढव दिले. आता शेवटी जॅक काहीतरी घरी घेऊन जाणार होता आणि आईला दाखवणार होता!



जॅकने मागच्या वेळी आईला वचन दिले होते, म्हणून एका आज्ञाधारक मुलासारखे त्याने ते गाढव खांद्यावर ठेवले आणि तो घरी निघाला.



जॅकच्या घराकडे जात असतांना रस्त्यावर एका सर्वात श्रीमंत माणसाची आलिशान हवेली होती. होती. पण तो शेठ खूप दुःखी होता. त्याची एक जोआना नावाची सुंदर मुलगी होती पण अजिबात बोलत नव्हती की हसत नव्हती..





डॉक्टरांनी शेठला सांगितले की एकदा जोआनाला कोणीतरी हसवले तर तिची ऐकण्याची आणि बोलण्याची क्षमता परत येईल.




म्हणून शेठने सगळीकडे जाहीर केले होते की जो कोणी प्रथम जोआनाला हसवेल ती त्याची बायको होईल.

जेव्हा जॅक धुळीने भरलेल्या रस्त्याने गाढवाला खांद्यावर घेऊन जात होता, तेव्हा गाढव हवेत पाय झाडत होते. तेव्हाच त्याला हसण्याचा आवाज ऐकू आला. एकामागून एक हास्याच्या लकेरी येऊ लागल्या.






मग जॅकने कुठून आवाज येतो ते बघितले तेव्हा हवेलीच्या एका खिडकीत जोआना बसली होती आणि ती वडिलांना हाका मारत होती, “बाबा लवकर या,फार मजेशीर दृश्य आहे. हा हा हा हा हा हो हो हो!“



मुलीच्या आवाजाने शेठ धावत आले. त्यांनी बघितले जोआना हसत आहे आणि तिची बोलण्याची आणि ऐकण्याची क्षमता परत आली आहे.

शेठजींनी धावत जाऊन जॅकला थांबवले. आणि ते म्हणाले, “तू तुझे गाढव इथे उतरव आणि माझ्या घरात ये. तू माझ्या मुलीला हसवले आहे. तुला तिच्याशी लग्न करायला आवडेल का?”







जॅक आनंदाने हो म्हणाला आणि त्या दोघांचे लग्न झाले.
मग अनेक वर्षे त्यांनी सुखाने संसार केला.



नंतर जॅकची आई त्यांच्याबरोबर आरामात राहण्यासाठी आली. एकापरीने जॅक आज्ञाधारक होता हे चांगलेच होते..





